# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ११/०२/२०१९

## मा. स्थायी समिती सभा

## सभा सूचना क्र. १८

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ..............................................
स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १५/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १८ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १५/०२/२०१९ सभा सुचना क्र. १८ विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ---- | मागील सभांचे इतिवृत्तांत - |
| १९७ | दि. २९/१२/२०१८ व दि. १६/०१/२०१९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| ---- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| ---- | विनंती अर्ज – निरंक |
| ---- | परिवहन व विशेष समित्यांचे ठराव – निरंक |
| ---- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज - |
| १९८ | मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणेबाबत. ("अ" + "क" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + "शिक्षण") |
| १९९ | परिवहन सेवेचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणेबाबत. |
| २०० | अग्निशमन विभागाचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणेबाबत. |
| २०१ | निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०२/२०१९ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १९१) |
| २०२ | निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| २०३ | साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत. |
| २०४ | माहे एप्रिल-१८ ते जून-१८ तसेच जुलै-१८ ते सप्टेंबर-१८ या त्रैमासिक जमाखर्चाचे अवलोकनाबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०२/२०१९ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १९२) |
| २०५ | मिरा भाईंदर महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभागाकरीता Pharmacy Management System संगणक आज्ञावली विकसित करणे व ३ वर्षे कालावधीकरीता देखभाल दुरुस्ती करणेकामी निविदेचे अवलोकन करणे. |
| ---- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे |
| ---- | समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

दिनांक :- ११/०२/२०१९

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## संगणक विभाग
## मा.स्थायी समिती सभा दि१५/१२/२०१९
## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (२०५) मिरा भाईंदर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाकरिता Pharmacy Management System संगणक आज्ञावली विकसित करणे व ३ वर्ष कालावधी करिता देखभाल दुरुस्ती करणेकामी निविदेचे अवलोकन करणे.**

मिरा भाईदर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाकरिता Pharmacy Management System संगणक आज्ञावली विकसित करणे व ३ वर्ष कालावधी करिता देखभाल दुरुस्ती करणेकामी MBMC/comp/337/2017-18 https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१६/१२/२०१७ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या निविदेस प्रतिसाद मिळुन दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. निविदेस दि.०२/०१/२०१८ रोजी प्रथम मुदतवाढ देण्यात आली. या निविदेस अल्प प्रतिसाद मिळुन दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. स्पर्धात्मक निविदा होण्यासाठी कमीत कमी तीन निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामाची स्पर्धात्मक निविदा होण्यासाठी सदर निविदेस दि.११/०१/२०१८ रोजी द्वितीय मुदतवाढ देण्यात आली. सदर निविदेचे टेंडर आयडी 2017_MBMC_264051_1 आहे.

सदर निविदेस प्रतिसाद मिळून ४ निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त निविदाधारकापैकी दोन निविदाधारक पात्र ठरले. सदर कामाची स्पर्धात्मक निविदा होत नसल्याने दि. २४/१०/२०१८ रोजी फेरनिविदा मागविण्यात आली. सदर निविदेचे टेंडर आयडी (2018_MBMC_365967_1) आहे.

सदर निविदेस दि.०२/११/२०१८ रोजी प्रथम मुदतवाढ व दि.१७/११/२०१८ रोजी द्वितीय मुदतवाढ दिली असता दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदाधारकापैकी दोन निविदाधारक M/s.NP Infoserve Technologies Pvt.Ltd., व M/s. Birlamedisoft Private Limited ., हे Pre-Qualification Bid मध्ये पात्र ठरले आहेत. Pre-Qualification Bid नुसार पात्र ठरल्यानंतर दराचा लिफाफा उघडणेकामी एकूण ७० किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाल्याने पात्र निविदाधारकांचा निविदेचा दराचा लिफाफा उघडणेस मा. निविदा निवड समितीने दि. ०५/०१/२०१९ रोजी शिफारस केलेली आहे. त्यानुसार निविदाधारकांनी निविदेत सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr.No. | Items | Quantity | Unit | M/s.NP Infoserve Technologies Pvt.Ltd., यांचे निविदेतील दर (३ वर्ष कालावधीकरिता) | M/s.NP Infoserve Technologies Pvt.Ltd., यांचे वाटाघाटीनंतरचे दर (३ वर्ष कालावधीकरिता) | M/s.Birlamedisoft Pvt.Ltd., यांचे निविदेतील दर (३ वर्ष कालावधीकरिता) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Pharmacy Management System along with Mobile Application and registration & renewal required for Mobile Application (No. of Users-20 Users) | 1 | Lump sum | 15,00,000/- (अधिक GST) | **15,00,000/-** (अधिक GST) | 35,00,000/- (अधिक GST) |
| 2. | Per Year Maintenance Support Cost of Pharmacy Management System | 3 | Year | 3,00,000/- (अधिक GST) | **3,00,000/-** (अधिक GST) | 3,50,000/- (अधिक GST) |
| 3. | Training of officers/users of MBMC as per scope for work | 1 | Lump sum | 1,50,000/- (अधिक GST) | **Training Free** | 1,50,000/- (अधिक GST) |
| **Total** | | | | **19,50,000/-** (अधिक GST) | **18,00,000/-** (अधिक GST) | **40,00,000/-** (अधिक GST) |

वरीलप्रमाणे निविदाधारक M/s.NP Infoserve Technologies Pvt.Ltd., यांनी निविदेत सादर केलेले दर हे M/s. Birlamedisoft Private Limited यांच्या निविदेतील दरापेक्षा कमी असल्याने M/s.NP Infoserve Technologies Pvt.Ltd., पात्र ठरले आहेत. पात्र निविदाधारक यांना निविदेतील दरासंबंधित वाटाघाटी करणेकामी बोलविले असता पात्र निविदाधारक M/s.NP Infoserve Technologies Pvt.Ltd., यांचे वाटाघाटीनंतर सादर केलेले दर स्विकारणेस मा. निविदा निवड समितीची शिफारसनुसार M/s.NP Infoserve Technologies Pvt.Ltd., यांच्या समवेत कामाचा करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेस मा. आयुक्त सो. यांची दि.२४/०१/२०१९ रोजी मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामी ३ वर्ष कालावधीकरिता रु. १८,००,०००/- (अधिक GST) खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त विषयाचे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(ड) नुसार अवलोकन करणेस शिफारस असे.
मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

(श्री. विजयकुमार म्हसाळ)
उपायुक्त (मु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\MEGHA 2018\GOSHWARA\Pharmacy Management System for MBMC.docx